## सुविचार

जीवनात यश मिळवण्यासाठी फक्त स्वप्न पाहणे पुरेसे नसते; त्या स्वप्नांसाठी सातत्याने कष्ट, संयम आणि सकारात्मक विचारांची जोड दिली तरच मेहनतीचे फळ नक्कीच गोड मिळते.

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १९ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - ११७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## फडणवीस-गोर यांची भेट

**नवी दिल्ली** : अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर यांनी शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अमेरिकेची महाराष्ट्रातील गुंतवणूक तसेच महाराष्ट्रातील व्यवसायांना अमेरिकेत संधी यावर चर्चा झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान व उत्पादन या विषयांवर दोघांमध्ये चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र व अमेरिकेतील भागीदारी अधिक दृढ करण्यावर दोन्ही नेत्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे.

## सारांश वृत्त

### उत्तर भारतात थंडीची लाट

**नवी दिल्ली :** देशाच्या उत्तरेकडील भागात थंडीची लाट पसरली असून, रविवारी काश्मीरमध्ये किमान तापमानात घट झाली आणि पंजाबमधील अमृतसरमध्ये १.७ अंश सेल्सिअस तापमानाचा थरकाप उडाला. रविवारी सकाळी हरियाणाच्या नूह येथे दाट धुक्यात कुंडली-मानेसर-पलवल (केएमपी) एक्सप्रेस वेवर अनेक वाहनांच्या धडकेत ट्रक चालकासह दोघांचा जळून मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. या अपघातामुळे दीर्घकाळ वाहतूक कोंडी झाली आणि एक्सप्रेस वेवरील वाहतूक विस्कळीत झाली. बरेली जिल्ह्यात, दिल्ली-लखनऊ महामार्गावर २० वाहने एकमेकांवर आदळली.

### बाल तस्करी रॅकेटचा पर्दाफाश

**रांची :** झारखंड पोलिसांनी रविवारी एका आंतरराज्यीय बाल तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आणि राज्यातील विविध जिल्ह्यांमधून अपहरण केलेल्या १२ मुलांची सुटका केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलिसांनी टोळीतील १३ जणांना अटक केली आहे, ज्यात महिलांचा समावेश आहे. रांचीचे एसएसपी राकेश रंजन म्हणाले, एसआयटीने आतापर्यंत १२ मुलांची सुटका केली आहे, ज्यांना राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून सक्रिय आंतरराज्यीय मुले चोरणाऱ्या टोळीने अपहरण केले होते.

### मनी लॉंड्रिंग प्रकरणात एकाला अटक

**नवी दिल्ली :** अमली पदार्थांच्या तस्करीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात विविध राज्यांमध्ये छापे टाकल्यानंतर अंमलबजावणी संचालनालयाने एका अमली पदार्थ तस्कराला अटक केली आहे आणि सुमारे ३ कोटी रुपये रोख जप्त केले आहेत. १६ जानेवारी रोजी गोवा, महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, ओडिशा आणि दिल्ली येथील २६ ठिकाणी छापे टाकले.

## महापौरपद एकनाथ शिंदेंकडे राहण्यासाठीच होताहेत प्रयत्न

# उद्धव ठाकरे देवाभाऊंना रोखणार का ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या नगरसेवकाची वर्णी लागू नये, यासाठी सर्व शक्ती पणाला लावून उद्धव ठाकरे प्रयत्नात असून, मुंबईचा महापौर हा शिंदेंच्या शिवसेनेचा व्हावा, पण तो शिवसेनेचाच असावा, यासाठीची रणनीती आखली जात असल्याची माहिती मिळत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप-एकनाथ शिंदे गटाच्या युतीला काठावरचे स्पष्ट बहुमत मिळाले असले, तरी मुंबईचा पुढील महापौर कोण होणार, यावरून राजकीय रस्सीखेच तीव्र झाली आहे. युतीकडे एकूण ११८ जागा आहेत. त्यात भाजपच्या ८९ तर शिंदे गटाच्या शिवसेनेच्या २९ जागांचा समावेश आहे. ठाकरे गटाच्या शिवसेनेला ६५ जागा मिळाल्या आहेत. हे निकाल ठाकरे कुटुंबीयांच्या तीन दशकांच्या मुंबईवरील वर्चस्वाचा अंत दर्शवणारे मानले जात असले, तरी सत्तास्थापनेचा खेळ अजून संपलेला नाही.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांचे काही नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या वृत्ताने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून फोडाफोडीचे राजकारण पुन्हा पाहायला मिळणार असल्याच्या शक्यतांनी जोर धरला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचे निवडून आलेले काही नगरसेवक हे नॉट रिचेबल असल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असल्यामुळे विरोधी बाकांवर बसण्याची मानसिकता नसलेले ठाकरे गटाचे काही नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या संपर्कात असल्याची माहिती मिळतेय.


भाजपकडे सर्वाधिक जागा असल्या, तरी ११४ चा 'मॅजिक फिगर' गाठण्यासाठी एकनाथ शिंदे यांची साथ अपरिहार्य आहे. हीच गरज ओळखून शिंदे गटाकडून महापौरपदाची अडीच-अडीच वर्षांची समान वाटणी, तसेच स्थायी समिती आणि इतर महत्त्वाच्या समित्यांमध्ये योग्य प्रतिनिधित्वाची मागणी भाजपसमोर ठेवली जाण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे यांनी "देवाच्या मनात असेल तर मुंबईचा महापौर शिवसेनेचाच होईल," असे सूचक विधान केल्याने सस्पेन्स वाढला. या वक्तव्यानंतर ठाकरे गटाकडून पडद्यामागे हालचालींना वेग आला असून, शिंदे गटाच्या नगरसेवकांशी संपर्क साधला जात असल्याची माहिती आहे. यामुळे महायुतीत अस्वस्थता वाढल्याचे चित्र आहे. खासदार संजय राऊत यांनी यापूर्वीच मुंबईत भाजपचा महापौर होऊ नये, अशी भूमिका मांडत शिंदे गटातील नगरसेवक हे मूळचे शिवसैनिक आणि मराठी असल्यावर भर दिला होता. शिंदे गटाच्या २९ नगरसेवकांपैकी २५ मराठी असल्याचे सांगत त्यांनी या गटातही अस्वस्थता असल्याचे संकेत दिले होते.

संभाव्य दगाफटका टाळण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी आपल्या सर्व नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लॅंड्स एन्ड या पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवले असल्याची माहिती आहे. महानगरपालिकेत सत्तास्थापना होईपर्यंत हे नगरसेवक हॉटेलमध्येच राहणार असल्याचे सांगितले जात आहे.

# जातीवादाचे लवकरच उच्चाटन: मोहन भागवत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आरएसएसच्या शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रमात जातीवादाच्या निर्मूलनावर भाष्य केले. भागवत म्हणाले की, जातभेद मुळात संपवण्यासाठी प्रथम मनातून जातीवाद नष्ट करणे आवश्यक आहे. पूर्वी जात व्यवसायाशी जोडली जात होती, मात्र समाजात पसरल्यामुळे भेदभावाला कारणीभूत ठरली. त्यांनी सांगितले की, जर प्रामाणिक प्रयत्न केले, तर 10 ते 12 वर्षांत जातीवादाचे उच्चाटन शक्य आहे.

संघाचे उद्दिष्ट व्यक्तींच्या चारित्र्यनिर्मितीद्वारे समाज आणि राष्ट्राला वैभवाकडे नेणे आहे, तसेच समाजाला सोबत घेऊन जाणे महत्वाचे आहे. भागवत म्हणाले की, 'संघ व्यक्तींच्या चारित्र्य निर्मितीद्वारे राष्ट्रनिर्माणाचे काम करतो आणि ही प्रतिक्रिया म्हणून स्थापन झालेली संघटना नाही किंवा ती कोणाशीही स्पर्धा करत नाही.' त्याचा उद्देश स्व-उच्चारण नव्हे, तर राष्ट्रनिर्माणात योगदान देणे आहे. शताब्दीच्या निमित्ताने संघाने देशभर वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले असून, समाजाचा विकास, व्यवस्था सुधारणा आणि जनजागृतीसाठी संघाच्या विविध संघटना कार्यरत आहेत.

# किश्तवाडमध्ये चकमक; शोधमोहीम तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील वरच्या भागातील दुर्गम जंगल परिसरात रविवारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि दहशतवादी कारवाया निष्प्रभ करण्यासाठी लष्कराची मदत घेण्यात आली असून, परिसरात मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १२ वाजता चतरू पट्ट्यातील मंद्राल–सिंगूरा परिसरातील सोन्नार गावाजवळ संयुक्त घेराबंदी व शोध मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांचा दहशतवाद्यांशी संपर्क आला. ही मोहीम जम्मू आणि काश्मीर पोलिस व लष्कराकडून संयुक्तपणे राबवण्यात येत होती.

जम्मू-स्थित लष्कराच्या 'व्हाईट नाईट कॉर्प्स'ने दिलेल्या माहितीनुसार, दहशतवादविरोधी कारवाई सुरू असताना सुरक्षा दलांचा दहशतवाद्यांशी सामना झाला. प्रत्युत्तर देताना जवानांनी उच्च व्यावसायिकता आणि ठामपणा दाखवला, असे लष्कराने स्पष्ट केले. शोध पथकांपैकी एका पथकाला दोन ते तीन परदेशी दहशतवाद्यांचा गट आढळला. हा गट पाकिस्तानस्थित जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचा संशय आहे. सुरक्षा दलांनी तात्काळ प्रत्युत्तर देत परिसरातील घेराबंदी आणखी कडक केली. लष्कर, केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) आणि जम्मू-काश्मीर पोलिसांचे अतिरिक्त पथक घटनास्थळी तैनात करण्यात आले.

## महाराष्ट्रातील शहरी राजकारणात मोठा बदल

# विजय भाजपाचा की लाडक्या देवाभाऊचा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने मोठ्या प्रमाणात यश मिळवले. मागील काळात झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपाचा विजय होतो असे म्हटले जात होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले उमेदवार उभे केले आणि ते निवडून आले, त्याला अनेक कारणे आहेत. विधानसभेला लाडकी बहीण चालली, तशीच लाडकी बहीण भावाच्या मदतीला धावली का, हा देखील विषय महत्त्वाचा आहे. विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये भाजप कमी आणि देवाभाऊ प्रेमी अधिक आहेत, असे म्हणता येते.



राज्यातील महापालिका निवडणुकीमध्ये महायुती विरोधात महाविकास आघाडी असा विषय नव्हता. वातावरण भाजपाच्या विरोधात दिसत असले, तरी विरोधी पक्षातील कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शरद पवार गट, वंचित बहुजन विकास आघाडी, एमआयएम हे पूर्वीपासून विरोधात होते. सहकारी पक्ष असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेना हे देखील काही प्रमाणामध्ये अनेक ठिकाणी विरोधामध्ये गेले होते. त्यामुळे भाजपने ही निवडणूक स्वतंत्ररीत्या लढवली. म्हणजेच भविष्यामध्ये भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार याचीच ही रंगीत तालीम होती, असे समजावे लागेल. कारण मुंबईत २५ वर्षांनंतर ठाकरेंच्या ताब्यातून घेण्यात भाजपाला यश आले. भाजप म्हणजेच महाराष्ट्रात सध्या देवेंद्र फडणवीस असे सिद्ध झालेले आहे. मुंबईमध्ये भाजपने सत्ता मिळवणे सोपे नाही. त्यातही त्यांनी शिवसेना शिंदे गट यांना सोबत घेतले. त्यामागे अनेक अर्थ असू शकतात. त्या ठिकाणी त्यांनी मिळवलेले यश हे भाजपचे, संघाचे का मुख्यमंत्री फडणवीस यांचे हे मात्र कोणी सांगू शकत नाही.

आजपर्यंत भाजप विजयी होते ते केवळ ईव्हीएम मशीनमुळे असाच आरोप केला जात होता. आता ईव्हीएम मशीनवर कोणी बोलताना दिसत नाही. त्यातही महापालिका निवडणुकीमध्ये मुंबई, कल्याण, वसई-विरार, ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर अशा मोठ्या महापालिकेमध्ये भाजपाने मिळवलेले यश फारच मोठे म्हणावे लागेल. ज्या ठिकाणी त्यांची कधीही दुहेरी संख्या नव्हती, त्या ठिकाणी त्यांनी ती पूर्ण केली. भाजप पूर्वी देखील होती, भाजप आजही आहे, मात्र नेतृत्व बदलले गेले असल्याचे दिसते. हा नेतृत्वाचा परिणाम किंवा देवाभाऊचा परिणाम असे म्हणावे लागेल.

देवाभाऊचे राजकारण सर्वसामान्यांना अद्याप समजले नाही. ज्यांनी साठ वर्ष राजकारण केले, त्या शरद पवारांना देखील देवाभाऊ वरचढ दिसल्याचे आज दिसून आले. पुणे आणि पिंपरी चिंचवड हा पवारांचा बालेकिल्ला. मात्र तिथे दोन्ही पवारांना एकत्र येऊनही, भाजपाला पराभूत करणे शक्य झाले नाही. मात्र निवडणुकीपूर्वी भाजपने केलेली खेळी भाजपच्या फायद्याची ठरली, हे पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये दिसून आल्याचे म्हणावे लागेल. लातूर महापालिकेमध्ये भाजपाने चांगले यश मिळवले, असे म्हणावे लागेल. तेव्हा विषय असा येतो की हा विजय भाजपाचा आहे की, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या रणनीतीचा. पक्ष हा प्रमुख असला तरी रणनीती ठरवणारा पक्षाला यश मिळवून देतो. त्यामुळे देवाभाऊंचा करिष्मा चालला हे नाकारता येणार नाही.

# तुतारीची धून थांबणार, घडीचा गजर होणार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निकालानंतर भाजपला मोठे यश मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. तर एकत्र आलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाला फारसे यश मिळवता आलेले नाही. अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी मोठे प्रयत्न केले होते. मात्र येथेही मित्रपक्ष असलेला भाजप वरचढ ठरला. यानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार आहेत. मात्र या निवडणुकीत तुतारी नाही तर घड्याळाच्या चिन्हांवर लढण्याची तयारी शरद पवारांच्या पक्षाकडून केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. मत विभाजन टाळून एकत्र लढल्यास फायदा होईल अशी भूमिका शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून घेतली जात आहे.

शनिवारी झालेल्या बैठकीमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाने घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवावी त्यांना अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. त्यानंतर दोन्ही पक्षांमधील मत विभाजन टाळण्यासाठी घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्यावर दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, १६ जानेवारी पासून राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे लवकरच याबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. नुकत्याच झालेल्या राज्यातील महानगरपालिका मध्ये भाजप हा सर्वाधिक मोठा पक्ष ठरला आहे. त्यानंतर शिंदे यांची शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर आहे. अजित पवार हे महायुतीच्या माध्यमातून सत्तेमध्ये आहेत. मात्र तरीसुद्धा त्यांच्या वाट्याला अत्यंत कमी जागा आल्या. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी थेट बारामती गाठून शरद पवार यांच्याशी चर्चा केली. यावेळी सुप्रिया सुळे यांच्यासह खासदार अमोल कोल्हे आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते. या दोघांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका एकत्र लढविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्याचवेळी निवडणूक कोणत्या चिन्हावर लढवायची हा प्रश्न उपस्थित झाला आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी तुतारी सोडून घड्याळावर निवडणूक लढविणार असे समोर आले आहे. यामुळे यापुढे तुतारीचा निनाद होणार की नाही अशी शंका उपस्थित झाली आहे.

### प्रतिकूल हवामानाचा सफरचंदाला फटका

**नवी दिल्ली :** प्रतिस्थिती हवामान, बुरशीजन्य रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे हिमाचल प्रदेशातील सफरचंद उत्पादक मोठ्या संकटात सापडले आहेत. सफरचंद उत्पादनात किमान ५० टक्क्यांची घट झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अतिवृष्टीमुळे रस्ते उद्ध्वस्त झाले. त्यानंतर दीर्घकाळ कोरडे हवामान राहिल्याने बागांवर दुहेरी संकट कोसळले. कापणी केलेले सफरचंद वेळेवर बाजारात पोहोचू शकले नाहीत आणि अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना ते टाकून द्यावे लागले. सरकारने आयात होणाऱ्या परदेशी सफरचंदांविरोधात केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली जात आहे.

# पुण्यात 'पे अँड पार्क'ला पुन्हा ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या सहा प्रमुख रस्त्यांवर 'पे अँड पार्क' योजना राबवण्याचा महापालिकेचा प्रयत्न सध्या अडचणीत सापडला आहे. लक्ष्मी रस्ता, जंगली महाराज रस्ता, नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता (फर्ग्युसन कॉलेज), बालेवाडी हायस्ट्रीट, विमाननगर रस्ता आणि बिबवेवाडीतील मुख्य रस्ता या ठिकाणांसाठी काढलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने महापालिकेने त्यांना पुन्हा मुदतवाढ दिली आहे. महापालिकेच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि आचारसंहिता संपल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने २०१८ मध्ये पार्किंग धोरणाला मान्यता दिली होती. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीला तब्बल सात वर्षांचा विलंब लागला. आता या धोरणानुसार 'पे अँड पार्क' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, दुचाकींसाठी प्रतितास चार रुपये शुल्क आकारण्याचे प्रस्तावित आहे. या सहा रस्त्यांवर सुमारे ६,३४४ दुचाकी आणि ६१८ चारचाकी वाहने पार्क करता येणार असून, त्यातून महापालिकेला अंदाजे १२ कोटी रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळू शकते, असे निविदांमधून स्पष्ट झाले आहे.


शहरातील रस्त्यांवर बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचे प्रकार वाढले आहेत. विशेषतः लक्ष्मी रस्त्यावर सकाळीच स्थानिक व्यावसायिकांच्या कर्मचाऱ्यांची वाहने तासन्तास पार्क केली जात असल्याने खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना पार्किंग मिळत नाही. येथील महापालिकेच्या अधिकृत वाहनतळावर दुचाकीसाठी प्रतितास २० रुपये आकारले जातात. महापालिकेने ताशी तीन ते चार रुपये दर निश्चित केला असतानाही, काही ठिकाणी वाहनतळ चालकांकडून मनमानी सुरू असल्याच्या तक्रारी आहेत.

वाहतूक पोलिसांनीही 'पे अँड पार्क' योजना सुरू करण्यासाठी महापालिकेवर दबाव टाकला आहे. अखेर सात वर्षे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर निर्णय घेत प्रायोगिक तत्त्वावर सहा प्रमुख रस्त्यांवर ही योजना सुरू करण्याचे ठरवण्यात आले. मात्र निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने ही योजना प्रत्यक्षात येण्यास पुन्हा विलंब होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांचे प्रतिपादन

# ऊर्जा, व्यापार, तंत्रज्ञानही संघर्षाचे नवे आयाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नागपूर :** युद्धे आता केवळ सीमांपुरती मर्यादित राहिलेली नसून ऊर्जा, व्यापार, शुल्क, पुरवठा साखळी, तंत्रज्ञान आणि माहिती हेही संघर्षाचे नवे आयाम बनले आहेत, असे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी नागपुरात स्पष्ट केले. येथील सोलर इंडस्ट्रीजच्या मध्यम कॅलिबर दारूगोळा निर्मिती सुविधेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

युद्धे अधिक गुंतागुंतीची आणि तीव्र होत असून, पारंपरिक युद्धात कधी न दिसलेल्या पद्धती आता समोर येत आहेत. अशा परिस्थितीत युद्धाची तयारीही युद्धपातळीवरच करावी लागेल, असे त्यांनी नमूद केले. संघर्षांचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होत असल्याने देशाच्या संरक्षण व्यवस्थेकडे अधिक सजगतेने पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

संरक्षण उत्पादन क्षेत्रातील बदलांचा उल्लेख करताना सिंह म्हणाले की, एक काळ असा होता जेव्हा संरक्षण उत्पादन फक्त सार्वजनिक क्षेत्रापुरते मर्यादित होते. खाजगी क्षेत्राकडे क्षमता असूनही त्यांचा सहभाग अपेक्षित पातळीवर नव्हता. मात्र, 'आत्मनिर्भर भारत'च्या दिशेने पावले टाकताना सरकारने धोरणांमध्ये बदल करून आणि प्रक्रिया सुलभ करून खाजगी क्षेत्राला संरक्षण उत्पादनासाठी खुले केले. यामागे खाजगी क्षेत्राच्या क्षमतेवर असलेला विश्वास कारणीभूत होता.

या बदलांमुळे उत्पादनाची गुणवत्ता, वेळेवर पुरवठा आणि एकूणच उत्पादकता सुधारली असून, संरक्षण परिसंस्थेत लक्षणीय प्रगती झाली आहे, असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे संशोधन आणि विकासाच्या बाबतीत खाजगी क्षेत्र आता सार्वजनिक क्षेत्रापेक्षा पुढे जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भारत वेगाने शस्त्रास्त्र निर्यातदार देश बनत असल्याचा विश्वास व्यक्त करताना सिंह म्हणाले की, काही वर्षांपूर्वी दारूगोळा पुरवठ्यात कमतरता जाणवत होती, मात्र आता देश या क्षेत्रात स्वावलंबी होत आहे. पिनाका क्षेपणास्त्रे आणि 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये वापरण्यात आलेले नागास्त्र ड्रोन यांसारख्या उत्पादन क्षमतांसाठी त्यांनी सोलर ग्रुपचे कौतुक केले.

सरकारची महत्त्वाकांक्षा भारताला दारूगोळा उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्याची आहे. भविष्यात युद्धाचे स्वरूप काहीही असले तरी मजबूत संरक्षण औद्योगिक पाया, संशोधन आणि विकास, तसेच खाजगी क्षेत्राचा मोठा सहभाग ही काळाची गरज असल्याचे सिंह यांनी स्पष्ट केले. संरक्षण उत्पादनात खाजगी क्षेत्राचा किमान ५० टक्के वाटा असावा, अशी सरकारची इच्छा असल्याचेही त्यांनी सांगितले.

आकडेवारी देताना त्यांनी नमूद केले की, २०१४ मध्ये देशांतर्गत संरक्षण उत्पादन ४६ हजार कोटी रुपयांचे होते, ते आता १.५० लाख कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. यामध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा सुमारे ३० हजार कोटी रुपयांचा आहे.

तसेच, दहा वर्षांपूर्वी केवळ १ हजार कोटी रुपयांची असलेली संरक्षण निर्यात आता २५ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून, २०२९-३० पर्यंत ती ५० हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे सरकारचे लक्ष्य आहे.

# ४२ विद्यार्थी मुस्लिम असल्याने महाविद्यालयाची मान्यता रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील श्री माता वैष्णो देवी वैद्यकीय महाविद्यालयात नीट परीक्षेच्या आधारे प्रवेश झाले असून अंतिम यादीत ५० पैकी ४२ विद्यार्थी मुस्लिम असल्याने त्या कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली. तर दुसऱ्या घटनेत मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यात मुस्लिम व्यक्तीने शाळा सुरू केल्यामुळे ती मदरसा असल्याच्या अफवा पसरवण्यात आल्या.

कोणतीही चौकशी, नोटीस किंवा सुनावणी न करता प्रशासनाने थेट बुलडोझर चालवून शाळा पाडली, असे गंभीर आरोप कॉंग्रेसने केंद्रात सत्ताधारी भाजपवर केले. देशातील विविध भागांत अलीकडे घडलेल्या घटनांचा दाखला देत कॉंग्रेसने केंद्रातील भाजप सरकारवर शिक्षण व्यवस्थेला जाणीवपूर्वक सांप्रदायिक रंग देत उद्ध्वस्त करण्याचा गंभीर आरोप केला आहे. कॉंग्रेस मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जम्मू-काश्मीर व लडाखचे प्रभारी, खासदार डॉ. सय्यद नासिर हुसेन आणि राष्ट्रीय सचिव दिव्या मडेरणा यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका केली.

डॉ. नासिर हुसेन म्हणाले की, चांगली शिक्षण व्यवस्था ही विकसित राष्ट्राची पायाभरणी असते. मात्र सध्याचे सरकार शिक्षण क्षेत्रात "विष कालवण्याचे" काम करत आहे. अब्दुल नईम नावाच्या व्यक्तीने स्वतःच्या खर्चातून आदिवासी मुलांसाठी शाळा उभारली होती. मात्र मुस्लिम व्यक्तीने शाळा सुरू केल्यामुळे ती प्रशासनाने थेट बुलडोझर चालवून शाळा पाडली, असा आरोप त्यांनी केला.

## संपादकीय

# कला, अस्वस्थता आणि न बोललेले प्रश्न



**ए. आर. रहमान यांच्या एका विधानाने बॉलिवूडमधील अस्वस्थता पुन्हा उघड झाली आहे. काम, ओळख, विचारसरणी आणि इतिहास यांचा गुंता अधिक घट्ट होत असताना, कलेला किती मोकळीक आहे आणि समाज किती सहनशील आहे, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**

भारतीय चित्रपटसृष्टी म्हणजे फक्त चमचमता पडदा नाही. तो समाजाच्या मनातील ललेल्या घडामोडी, अस्वस्थता, भीती आणि अपेक्षा यांचे प्रतिबिंब ठरतो. म्हणूनच ए. आर. रहमानसारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचा कलाकार जेव्हा अस्वस्थतेने काहीतरी बोलतो, तेव्हा तो प्रश्न निव्वळ त्याच्यापुरता मर्यादित राहत नाही. तो एका व्यापक बदलाकडे लक्ष वेधतो. बॉलिवूडमध्ये आपल्याला पूर्वीइतके काम मिळत नसण्यामागे जातीयवादी मानसिकता असू शकते, असे सूचक विधान रहमान यांनी केले आणि त्या एका वाक्याने संपूर्ण सिनेउद्योगात खळबळ उडाली. रहमान यांनी कुणाचे नाव घेतले नाही. कुणावर थेट आरोप केला नाही. कानी आले, ऐकिवात आहे अशा शब्दांत त्यांनी आपली भावना मांडली. पण आजच्या काळात एवढे बोलणेही पुरेसे ठरते. आपण सध्या संशयाच्या वातावरणात जगतो. प्रत्येक वाक्याचा अर्थ लावला जातो, त्यामागचा हेतू शोधला जातो आणि मग लगेच बाजू ठरवली जाते. त्यामुळे काहींना रहमान यांचे विधान ही धोक्याची घंटा वाटली, तर काहींना ते अनावश्यक आणि अतिशयोक्त भासले. आजवर रहमान यांचा धर्म, पंथ यांचा विचार न करता, त्यांना कामे मिळत असल्याने, आता ते राजकारण करत आहेत का, हाही एक प्रश्न. बॉलिवूडने नेहमीच स्वतःला धर्मनिरपेक्ष, सर्वसमावेशक क्षेत्र म्हणून मांडले आहे. धर्म, जात, भाषा या चौकटी ओलांडून अनेक कलाकार येथे घडले, मोठे झाले आणि टिकले, ही वस्तुस्थिती. तथापि, आजचा सिनेउद्योग पूर्वीसारखा राहिलेला नाही. तो अधिक कॉर्पोरेट झाला आहे, अधिक व्यवहारकेंद्री झाला आहे आणि काही प्रमाणात विचारसरणींच्या प्रभावाखालीही आहे. अशा परिस्थितीत एखाद्या कलाकाराला आपले स्थान डळमळीत झाले आहे, असे वाटणे, ही भावना अत्यंत स्वाभाविक. अनेक ज्येष्ठ लेखक, कवी आणि कलाकारांनी स्पष्टपणे सांगितले की आजही काम हे गुणवत्तेवरच मिळते, धर्मावर नाही. बॉलिवूड ही एकसंध व्यवस्था नाही. त्याचे काम अनेक गट-तट, ओळखी, वैयक्तिक समीकरणे आणि व्यावसायिक गरजांनी चालतो. एखाद्याला काम मिळाले नाही, यामागे अनेक कारणे असू शकतात. त्यामागे एकच कारण आहे, असे मानने म्हणजे त्या प्रश्नाची गुंतागुंत वाढवणे. या चर्चेला वेगळे वळण मिळाले ते ‘छावा’ या चित्रपटाबाबत रहमान यांनी केलेल्या निरीक्षणामुळे. आज इतिहासावर आधारित चित्रपट भूतकाळ दाखवत नाहीत; तर ते वर्तमानातील भावना मांडतात. इतिहास कसा सांगितला जातो, कोणते संदर्भ पुढे आणले जातात आणि कोणते बाजूला ठेवले जातात, यावर समाजातील ताणतणाव ठरतात. त्यामुळे ‘विभाजनकारी’ हा शब्द वापरला गेला, तेव्हा तो फक्त एका चित्रपटापुरता मर्यादित नव्हता. तो आजच्या सामाजिक वातावरणावर भाष्य करणारा होता. याच पार्श्वभूमीवर कंगना राणावत यांची प्रतिक्रिया समोर आली. ती नेहमीप्रमाणे तीव्र, आक्रमक आणि वैयक्तिक आहे. हा वाद दोन कलाकारांमधला नाही, तर दोन दृष्टिकोनांमधला आहे. एकीकडे अस्वस्थ प्रश्न उपस्थित करणारी भूमिका आणि दुसरीकडे व्यवस्थेला थेट आव्हान देत आपणच बरोबर असल्याचा दावा करणारी भूमिका. या दोन टोकांमध्ये संवाद हरवत चालल्याचे प्रकर्षाने दिसते. प्रश्न असा आहे की आपण नेमके कुठे अडकलो आहोत? कला अजूनही स्वतंत्र आहे का, की ती ओळखींच्या चौकटीत अडकत चालली आहे? आज कलाकार काय बोलतो यापेक्षा तो कोण आहे, हे जास्त महत्त्वाचे ठरते. ही स्थिती अधिक चिंताजनक. रहमान बरोबर की चूक, हा मुद्दा दुय्यम. पण एका संवेदनशील कलाकाराला अशी शंका वाटावी, हे आपल्या समाजाबद्दल बरेच काही सांगून जाते. कला मोकळी श्वास घेऊ शकली नाही, तर समाजही गुदमरतो आणि गुदमरलेला समाज शेवटी केवळ घोषणांवर जगू लागतो. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही. तथापि, त्या प्रश्नांना आपण कसे सामोरे जातो, यावर आपल्या प्रगल्भतेची खरी कसोटी लागते. या सगळ्या वादात ठोस उत्तरांपेक्षा अस्वस्थता अधिक आहे आणि कदाचित हीच अस्वस्थता आजच्या काळाचे सर्वात प्रामाणिक चित्र मांडणारी आहे.

# निकालाचे कवित्व संपले, कामाला लागा!

**महापालिका निकालांचे कवित्व आता संपले असून, प्रत्यक्ष कामाला लागण्याची वेळ आली आहे. प्रशासनाच्या हाती जो कारभार आहे, तो नवनिर्वाचित कारभाऱ्यांनी आपल्या हाती घेणे नितांत आवश्यक आहे. त्यातूनच सामान्यांना दिलासा मिळणार आहे.**



निवडणूक झाली, निकाल लागले आणि राजकीय वातावरणातला उत्साह आता ओसरू लागला आहे. प्रचाराच्या काळात जे शब्दांचे फटाके उडाले, जे वाद रंगले आणि ज्या घोषणा दिल्या गेल्या, त्यांचे कवित्व संपले आहे. मतदारांनी आपली भूमिका बजावली; आता जबाबदारी पूर्णपणे सत्तेवर बसलेल्या लोकांची आहे. लोकशाहीत विजय हा शेवट नसतो, ती केवळ सुरुवात असते, याची जाणीव आता करून घेण्याची वेळ आली आहे. शहरांचे प्रश्न निवडणूक निकालाने सुटत नाहीत. रस्ते खड्डेमुक्त होत नाहीत, नाले आपोआप साफ होत नाहीत आणि पाणी, कचरा, वाहतूक यांसारख्या समस्या एका रात्रीत नाहीशा होत नाहीत. निवडणूक प्रचारात हे प्रश्न होतेच, पण ते घोषणांच्या गर्दीत हरवले. आता निकालानंतर नागरिकांच्या अपेक्षा अधिक नेमक्या आणि ठोस झाल्या आहेत. ‘कोण जिंकले’ यापेक्षा ‘आता काय बदलणार’ हा प्रश्न जास्त महत्त्वाचा ठरतो आहे. मुंबईसारख्या महानगरात तर प्रशासनाचा प्रश्न हा थेट रोजच्या जगण्याशी जोडलेला आहे. पावसाळा आला की नाले, पूर आणि वाहतुकीचा गोंधळ हा ठरलेलाच. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई, कचऱ्याचे ढिगारे आणि वाढती दुर्गंधी हा वेगळाच त्रास. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ताणलेली आहे आणि पायाभूत सुविधा अनेक ठिकाणी कालबाह्य झाल्या आहेत. या सगळ्या प्रश्नांवर निवडणूक जिंकली म्हणून उत्तर मिळणार नाही; त्यासाठी सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक काम लागते. राजकीय पक्षांनी हे लक्षात घ्यायला हवे की प्रशासन चालवणे आणि निवडणूक जिंकणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. निवडणूक जिंकताना शब्द चालतात, प्रशासन चालवताना निर्णय लागतात. हे निर्णय अनेकदा अलोकप्रिय असू शकतात, पण ते आवश्यक असतात. पाणीपुरवठ्याचे नियोजन, रस्त्यांचे काम, कचरा व्यवस्थापन किंवा सार्वजनिक वाहतूक सुधारणा या सगळ्यांसाठी दीर्घकालीन दृष्टीकोन हवा. तात्पुरत्या डागडुजीने किंवा उद्घाटनांच्या फोटोसेशनने प्रश्न सुटत नाहीत. या सगळ्या प्रक्रियेत विरोधकांची भूमिका देखील महत्त्वाची ठरते. विरोध म्हणजे अडथळा नव्हे; तो अनेकदा दुरुस्तीची संधी असतो. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचे म्हणणे ऐकून घेतले, तर निर्णय अधिक व्यापक आणि वास्तववादी होऊ शकतात. महानगरपालिका ही एखाद्या पक्षाची खाजगी मालमत्ता नसून ती संपूर्ण शहराची जबाबदारी आहे, ही जाणीव प्रशासनाला सतत ठेवावी लागते. नागरिकांची भूमिका देखील बदलण्याची गरज आहे. निवडणुकीपुरते जागरूक होणे पुरेसे नाही. निर्णय कसे घेतले जात आहेत, निधी कुठे खर्च होत आहे आणि कामाची गुणवत्ता काय आहे, याकडे लक्ष ठेवणे हेही लोकशाहीचे महत्त्वाचे अंग आहे. फक्त सोशल मीडियावर तक्रारी करणे किंवा निवडणुकीच्या वेळी नाराजी व्यक्त करणे इतक्यावर नागरिकत्व संपत नाही. प्रश्न विचारणे, माहिती मागणे आणि उत्तरांची मागणी करणे हे नागरिकांचे अधिकार आहेत. निवडणूक प्रचारात मोठमोठ्या योजना, आर्थिक आश्वासने आणि भावनिक मुद्दे मांडले जातात. पण शहर चालते ते पाणी, रस्ता, वीज, स्वच्छता आणि वाहतूक यावर. हे मूलभूत प्रश्न सुटले नाहीत, तर इतर सगळ्या घोषणा पोकळ ठरतात. म्हणूनच आता प्राथमिकता बदलण्याची गरज आहे. प्रचाराच्या भाषणातून बाहेर येऊन प्रत्यक्ष कामाच्या टेबलावर बसण्याची ही वेळ आहे. शहरांच्या विकासासाठी पारदर्शकता आणि जबाबदारी या दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत. कोणते काम कधी होणार, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे आणि त्याचा परिणाम काय होणार, हे स्पष्टपणे मांडले गेले तर नागरिकांचा विश्वास वाढतो. विश्वासाशिवाय प्रशासन चालत नाही आणि विश्वास घोषणांनी मिळत नाही; तो कामातूनच निर्माण होतो. निकालाचे कवित्व संपले आहे. आता शब्दांची नव्हे, तर कामाची गरज आहे. राजकीय विजय हा कागदावरचा असतो; नागरी समाधान हे रस्त्यावर, घरात आणि रोजच्या आयुष्यात दिसायला हवे. शहर चालवणे ही कसोटी असते, आणि ती कसोटी निकालाच्या दिवशी नव्हे, तर प्रत्येक दिवशी लागते. आता सत्तेवर बसलेल्यांनी तेच लक्षात ठेवून कामाला लागण्याची वेळ आली आहे.

# पीएम-ई ड्राइव्ह योजनेंतर्गत पीएमपीला १,००० ई-बस मिळणार

## मंत्रिमंडळाची मान्यता; पुणे-पिंपरी चिंचवडसाठी आधुनिक, पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) केंद्र सरकारच्या पीएम-ई ड्राइव्ह योजनेंतर्गत मागणी केलेल्या १,००० इलेक्ट्रिक बसला मार्ग मोकळा झाला आहे. या बसच्या संचालनासाठी संबंधित कंपन्यांना दरमहा द्यावयाची रक्कम पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून थेट वळती करण्याच्या (डायरेक्ट डेबिट मँडेट) प्रणालीस शनिवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. नागरिकांना उत्कृष्ट, स्वच्छ व पर्यावरणपूरक परिवहन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने ‘पीएम इलेक्ट्रिक ड्राइव्ह रिव्होल्युशन इन इनोव्हेटिव्ह व्हेइकल एनहान्समेंट’ (पीएम-ई ड्राइव्ह) योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत चार लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये इलेक्ट्रिक बस पुरविण्यात येत आहेत.

पीएमपीने या योजनेतून एकूण १,००० ई-बसची मागणी केली असून, त्यामध्ये ९ मीटर लांबीच्या २०० आणि १२ मीटर लांबीच्या ८०० बसचा समावेश आहे. या बसच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कंपनीला मासिक रक्कम अदा करण्यात येणार आहे. ही रक्कम केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एस्क्रो अकाउंटच्या माध्यमातून दिली जाणार आहे.

या प्रक्रियेसाठी राज्य सरकारमार्फत भारतीय रिझर्व्ह बँकेकडे ‘डायरेक्ट डेबिट मँडेट’ देणे आवश्यक असल्याने त्यास मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. यापूर्वी राज्यातील २३ शहरांसाठी अशाच प्रणालीस मान्यता देण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुणे महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती व पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण समिती स्थापन करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे पुणे महानगर क्षेत्रातील सार्वजनिक वाहतुकीला आधुनिक स्वरूप मिळणार असून, प्रदूषण कमी होण्यासही मोठी मदत होणार आहे.

# भाजपचा गड आला, पण ‘सिंह’ गेला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ पिंपरी-चिंचवडमध्ये विक्रमी विजयासह माजी महापौरांचा पराभव**

**पुणे :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने इतिहास घडवत १२८ पैकी तब्बल ८६ जागांवर विजय मिळवून सलग दुसऱ्यांदा एकहाती सत्ता मिळवली आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत नऊ जागांची वाढ करत भाजपने आपला गड अधिक भक्कम केला. राष्ट्रवादी काँग्रेसला ३६ जागांवर समाधान मानावे लागले, तर काँग्रेस, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या पक्षांना खातेही उघडता आले नाही. शिवसेनेला सहा जागा मिळाल्या.

२०१२ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने मिळवलेल्या ८३ जागांचा विक्रम मोडत भाजपने ८६ जागांचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या दणदणीत यशामुळे पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळात मंत्रिमंडळात स्थान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र या मोठ्या विजयाला धक्का देणारा निकाल प्रभाग क्रमांक ३२ मध्ये पाहायला मिळाला. भाजपच्या माजी महापौर माई उर्फ उषा ढोरे यांचा तब्बल २,७१२ मतांनी पराभव झाला. शहराचे महापौरपद भूषवलेल्या उमेदवाराचा पराभव भाजपसाठी अनपेक्षित आणि धक्कादायक ठरला आहे. या प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उज्ज्वला ढोरे यांनी १०,८४० मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच त्यांनी आघाडी कायम ठेवत अखेर विजयावर शिक्कामोर्तब केला. स्थानिक प्रश्न, बदलाची अपेक्षा आणि नाराजीचा फटका भाजपला बसल्याचे चित्र आहे.

# संपत्तीच्या वादातून मध्यरात्री सावत्र भावाने भावाची कार पेटवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ थेरगावमध्ये खळबळ, CCTVत प्रकार कैद**


**पिंपरी-चिंचवड :** थेरगाव परिसरात संपत्तीच्या वादातून एका सावत्र भावाने पेट्रोल टाकून भावाची कार पेटविल्याची धक्कादायक घटना मध्यरात्री घडली. या प्रकरणी आकाश बारणे यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, संपूर्ण प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश बारणे आणि त्यांच्या सावत्र भावामध्ये अनेक वर्षांपासून संपत्तीवरून वाद सुरू आहे. घटनेच्या दिवशीही दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्याच रागातून सावत्र भावाने मध्यरात्री सुमारे एकच्या सुमारास बाटलीत पेट्रोल आणून गल्लीत उभी असलेली कार पेटवली. काही वेळातच कारने पेट घेतल्याने नागरिकांनी धाव घेत अग्निशमन दलाला कळवले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बहिरट यांनी सांगितले की, या घटनेमागे कोणतेही राजकीय कारण नसून, कौटुंबिक वादातूनच हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू असून, त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

# दुचाकीसाठी तासाला ४ रुपये! पुण्यातील सहा प्रमुख रस्त्यांवर लवकरच ‘पे अँड पार्क’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ लक्ष्मी रस्ता, एफ.सी. रोडसह वर्दळीच्या भागांत पार्किंगचा शिस्तबद्ध प्रयोग; महापालिकेला १२ कोटींच्या उत्पन्नाची अपेक्षा**



**पुणे :** शहरातील प्रमुख रस्त्यांवर बेशिस्त पार्किंगमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून पुणे महापालिकेकडून ‘पे अँड पार्क’ योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लक्ष्मी रस्ता, जंगली महाराज रस्ता, नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता (फर्ग्युसन कॉलेज रोड), बालेवाडी हायस्ट्रीट, विमाननगर रस्ता आणि बिबवेवाडी येथील मुख्य रस्ता अशा सहा वर्दळीच्या ठिकाणी ही योजना सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, या योजनेसाठी काढण्यात आलेल्या निविदांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने त्याला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. महापालिका निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि आचारसंहिता संपल्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने २०१८ मध्ये पार्किंग धोरणाला मान्यता दिली होती. त्यानंतर तब्बल सात वर्षांनी ‘पे अँड पार्क’ला मुहूर्त लागणार असून, दुचाकींसाठी प्रतितास चार रुपये, तर चारचाकींसाठी स्वतंत्र दर निश्चित करण्यात आले आहेत. या सहा रस्त्यांवर सुमारे ६,३४४ दुचाकी आणि ६१८ चारचाकी वाहने पार्क करता येणार असून, त्यातून महापालिकेला सुमारे १२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. सध्या लक्ष्मी रस्त्यासारख्या वर्दळीच्या भागात व्यावसायिकांचे कर्मचारी सकाळपासून वाहने पार्क करून ठेवत असल्याने खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना पार्किंग मिळत नाही. काही ठिकाणी अधिकृत दरापेक्षा जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारीही आहेत. शहरात दोन ते तीन लाख बेवारस वाहने रस्त्यांवर पडून असल्याचा अंदाज महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांकडूनही ‘पे अँड पार्क’ योजनेची अंमलबजावणी करण्याचा आग्रह धरण्यात येत आहे. सात वर्षे प्रलंबित असलेल्या या प्रस्तावामुळे वर्दळीच्या रस्त्यांवरील पार्किंगला शिस्त लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’मुळे आज शहरातील प्रमुख रस्ते ९ तास बंद

## फर्ग्युसन कॉलेज रोड, गणेशखिंड, जे.एम. रोडसह अंतर्गत रस्त्यांवर वाहतूक निर्बंध; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे जिल्हा प्रशासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या सहकार्याने १९ ते २४ जानेवारीदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय सायकल शर्यत ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’च्या पार्श्वभूमीवर शहरात मोठे वाहतूक बदल करण्यात आले आहेत. या स्पर्धेतील ‘प्रोलॉग’ रेस सोमवारी (दि. १९) होणार असून, त्या दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शहरातील प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी पूर्णतः बंद राहणार आहेत.

या कालावधीत नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता (फर्ग्युसन कॉलेज रोड), गणेशखिंड रस्ता, जंगली महाराज रस्ता (जे.एम. रोड) तसेच त्यांना जोडणारे अंतर्गत उपरस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. खंडुजीबाबा चौक ते डेक्कन जिमखाना बस स्थानक असा स्पर्धेचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या मार्गावर दोन्ही बाजूंनी ‘नो-पार्किंग झोन’ जाहीर करण्यात आला असून, अत्यावश्यक सेवेतील रुग्णवाहिका, अग्निशमन दल व पोलिसांची वाहने वगळता इतर सर्व वाहनांना प्रवेशबंदी असणार आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहर वाहतूक पोलिसांनी विविध पर्यायी मार्ग निश्चित केले आहेत. एफ.सी. रोडवरून जाणाऱ्या वाहनचालकांनी प्रभात रस्ता, लॉ कॉलेज रोड, सेनापती बापट रस्ता, भांडारकर रस्ता, मॉडेल कॉलनी मार्गे प्रवास करावा. गणेशखिंडकडे जाणाऱ्यांनी ब्रेमेन चौक, भोसलेनगर किंवा सेनापती बापट रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करत सांगितले की, या स्पर्धेमुळे पुण्याची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर उजळणार आहे. तसेच २३ जानेवारी रोजीही स्पर्धेचा एक टप्पा पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात होणार असल्याने त्या दिवशीही टप्प्याटप्प्याने वाहतूक निर्बंध असतील, असे अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी स्पष्ट केले.

### अत्यावश्यक सेवावगळता सर्व वाहनांना बंदी

● ही स्पर्धा होणार असलेल्या मार्गावर रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे बंब, पोलिसांचे वाहनांसह तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून अन्य सर्व वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. स्पर्धा मार्गावर वाहने लावण्यास (नो-पार्किंग) बंदी घालण्यात आली आहे. स्पर्धा मार्गावरील रुग्णालयांशी संपर्क साधण्यात आला आहे. रुग्णवाहिकांना मार्ग उपलब्ध करुन देणे, तसेच त्वरीत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

### या पर्यायी मार्गांचा करा वापर

● शहरातील काही मुख्य मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात येणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. वाहनचालकांसाठी स्वारगेट, सारसबाग, नळस्टॉप, सेनापती बापट रस्ता, गणेशखिंड रस्ता, रेंजहिल, खडकी, जुना-मुंबई पुणे रस्ता, पाटील इस्टेट, संगम पूल, आरटीओ, शाहीर अमर शेख चौक, मालधक्का चौक, बोल्हाई चौक, नेहरू रस्ता, स्वारगेट असा वर्तुळाकार मार्ग निश्चित करण्यात आला आहे. वाहनचालकांनी शक्यतो मध्यभागातील प्रमुख रस्ते वापरण्याचे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हडपसर व येरवडा भागात भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील वेगवेगळ्या भागांत घडलेल्या दोन अपघातांत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, या घटनांमुळे शहरातील वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. हडपसरमधील रवडा परिसरात तसेच येरवड्यातील सादलबाबा दर्गा रस्त्यावर हे अपघात घडले.

हडपसरच्या रवडा भागात एका दुचाकीस्वाराचा गंभीर अपघात झाला. भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार रस्त्यावर कोसळला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीचा प्रयत्न केला, मात्र गंभीर जखमा झाल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, येरवड्यातील सादलबाबा दर्गा रस्त्यावर भरधाव टेम्पोने नियंत्रण गमावून थेट पदपथावर शिरत अनेक वाहनांना धडक दिली. या धडकेत पदपथावर चालणाऱ्या एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. टेम्पोच्या धडकेत रस्त्याच्या कडेला उभी असलेली वाहनेही नुकसानग्रस्त झाली. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

दोन्ही अपघातांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. शहरात वाढत चाललेला वेग, नियमांकडे होणारे दुर्लक्ष आणि बेदरकार वाहनचालना यामुळे अशा अपघातांची संख्या वाढत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जोगेश्वरी महिला बचत गटाचा आदर्शवत उपक्रम

**मंचर :** अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील जोगेश्वरी महिला बचत गटाने पहाडदऱ्यातील आदिवासी कष्टकरी महिलांसोबत हळदीकुंकू समारंभ साजरा करत सामाजिक भान जपले. थंडीच्या दिवसात उपयोगी ठरणाऱ्या चटईंचे वाण म्हणून १५० आदिवासी महिलांना वाटप करण्यात आले. प्लास्टिकच्या निरुपयोगी वाणाला फाटा देत गरजूंसाठी उपयुक्त वस्तू देण्याचा आदर्श या उपक्रमातून निर्माण झाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात बचत गटाच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचा वाटा उचलला.

### घोडनदी पात्रात अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळला

**मंचर :** कळंब येथील घोडनदी पात्रात एकलहरे गावच्या हद्दीत पुलाखाली ४० ते ५० वयोगटातील अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळून आला. मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसल्यानंतर मंचर पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. मृताच्या अंगावर निळा टी-शर्ट व काळसर पँट असून अंगाने जाडजूड व रंगाने निमगोरा आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला असून ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

### हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**मंचर :** अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन महाळुंगे पडवळ, माळवाडी येथे उत्साहात झाले. उद्घाटन प्रा. डॉ. शिवाजी टाकळकर यांच्या हस्ते पार पडले. एनएसएसमुळे समाजभान व नेतृत्वगुण विकसित होतात, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. श्याम मिसाळ होते. सरपंच सुजाता चासकर यांच्यासह ग्रामस्थ, प्राध्यापक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### नगराध्यक्षपदाच्या विजयानंतर शिंदे गटाचा आत्मविश्वास वाढला; जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांत चुरस

# नगरपरिषद निकालानंतर जुन्नर तालुक्यात राजकीय हालचालींना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** नगरपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर जुन्नर तालुक्यातील राजकारणाला वेगळे वळण मिळाले असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्तासमीकरणे अधिकच तापली आहेत. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराने नगराध्यक्षपदावर विजय मिळवल्याने शिंदे गटाचा आत्मविश्वास दुणावला असला, तरी तालुक्याचे आमदार शरद सोनवणे यांच्या नेतृत्वामुळे संपूर्ण तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे.

विधानसभा निवडणुकीतील यशानंतर आमदार शरद सोनवणे यांनी तालुक्यात सातत्याने जनसंपर्क वाढवला आहे. विकासकामांवर दिलेले लक्ष, स्थानिक प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि संघटनात्मक बांधणीमुळे त्यांची राजकीय घोडदौड थांबवणे विरोधकांसाठी आव्हान ठरत असल्याचे चित्र आहे. त्यांच्या प्रभावामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांची संख्या वाढताना दिसत आहे.

या बदलत्या राजकीय समीकरणांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील माजी आमदार अतुल बेनके यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. शरद सोनवणे यांची वाढती ताकद रोखण्यासाठी थेट जनसंपर्क, गावागावांत संघटन मजबूत करणे आणि कार्यकर्त्यांमध्ये नवसंजीवनी निर्माण करणे आवश्यक ठरणार असल्याचे राजकीय अभ्यासकांचे मत आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून विधानसभा निवडणूक लढवलेले सत्यशील शेरकर यांच्यासाठीही आगामी निवडणुका महत्त्वाच्या ठरणार आहेत. तालुक्यात पक्षाची ताकद टिकवायची आणि वाढवायची असेल, तर या निवडणुकांमध्ये प्रभावी नेतृत्व आणि संघटन कौशल्य दाखवणे गरजेचे ठरणार आहे.

दरम्यान, या सर्व राजकीय घडामोडींमध्ये भाजप काहीसा पिछाडीवर गेल्याचे चित्र आहे. तालुक्यात पक्षाचा प्रभाव कमी झाल्याची चर्चा असून, बदलत्या परिस्थितीत नव्याने रणनीती आखण्याची गरज व्यक्त होत आहे. आशाताई बुचके यांच्यासह भाजपच्या नेतृत्वास संघटन मजबूत करण्याचे आव्हान आहे.

याशिवाय, देवराम लांडे यांना आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत आदिवासी समाजाच्या मतदारांचा विरोध जाणवण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमादरम्यान घडलेल्या दुर्दैवी घटनेचा राजकीय फटका बसण्याचीही चर्चा सुरू आहे. ओतूर जिल्हा परिषद गटात विविध पक्षांचे उमेदवार आपली ताकद पक्षश्रेष्ठींकडे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात असून, राष्ट्रवादी काँग्रेसकडे उमेदवारांची संख्या अधिक असली तरी आमदार शरद सोनवणे कोणाला संधी देतील, की आयात उमेदवार उभा करतील, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

एकूणच, नगरपरिषद निवडणुकीनंतर जुन्नर तालुक्यातील राजकारण अधिकच तापले असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका अत्यंत चुरशीच्या आणि निर्णायक ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

#### शिंदे गटाचा आत्मविश्वास वाढला

● नगरपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर जुन्नर तालुक्यातील राजकारणाला वेगळे वळण मिळाले आहे. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराने नगराध्यक्षपदावर विजय मिळवल्यामुळे गटाचे मनोबल वाढले असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. विधानसभा निवडणुकीतील यशानंतर आमदार शरद सोनवणे यांनी तालुक्यात जनसंपर्क वाढवत विकासकामे, स्थानिक प्रश्न आणि संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुकांची संख्या वाढताना दिसत असून, त्यांची राजकीय घोडदौड थांबवणे विरोधकांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे माजी आमदार अतुल बेनके यांच्यासमोर कठीण आव्हान उभे राहिले आहे. जनतेशी थेट संवाद, गावपातळीवरील संघटन आणि कार्यकर्त्यांमध्ये नवसंजीवनी निर्माण करणे गरजेचे असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

---

# सिमा पवार यांचा समाजरत्न पुरस्काराने गौरव

### वंचित महिलांच्या न्यायासाठी उभारलेल्या चळवळीची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** सणसवाडी (ता. शिरूर) येथील सिमाई आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या सिमा पवार यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत विसावा सोशल फाउंडेशन व इंटरनॅशनल रिसर्च पब्लिकेशन ऑफ बिझनेस मॅनेजमेंट यांच्या वतीने महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. नागपूर येथे पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सिमा पवार यांनी सिमाई आधार फाउंडेशनची स्थापना करून समाजातील वंचित, पीडित व अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कार्य सुरू केले आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ, बचत गटांच्या माध्यमातून प्रशिक्षण, मार्गदर्शन व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे.

महिला व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी मुंबईसह दिल्ली येथेही आंदोलन करून सामाजिक प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर वाचा फोडली. त्यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या या चळवळीमुळे अनेक पीडित महिलांना न्याय मिळाला असून, समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे कार्य सुरू आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना महाराष्ट्र समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी उद्योजक रामरतन हाडगे, साहित्यिक मनीषा कांबळे, डॉ. संजय हर्षे, डॉ. रवींद्र दिगोरे, विसावा सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा स्वाती तरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारताना सिमा पवार म्हणाल्या की, "या पुरस्कारामुळे माझ्या सामाजिक कार्याला नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाली आहे. पुढील काळात महिलांवरील अन्याय, गुंडगिरी व दडपशाहीविरोधात 'गुंडगिरी विरुद्ध ताईगिरी' अशी व्यापक सामाजिक चळवळ उभी करणार आहे."

---

# चाकणमध्ये नूतन नगराध्यक्षा, उपनगराध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार

### श्री गणेश जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास भक्तिमय वातावरणात प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** श्री गणेश जयंतीच्या पावन निमित्ताने श्री संत सावता माळी समाज तरुण मंडळ, अखंड हरिनाम सप्ताह २०२६ (चाकण) यांच्या वतीने चाकण शहरातील सर्व नूतन लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार समारंभ शुक्रवारी (दि. १६ जानेवारी) सकाळी भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. दोस्ताना ग्रुपच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास चाकण पंचक्रोशीतील नागरिक, महिला भगिनी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी चाकणच्या प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्ष सुवर्णा राक्षे, सत्ताधारी गटनेते नितीन गोरे, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ यांच्यासह सर्व नगरसेवक आणि पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणात औपचारिक सुरुवात करण्यात आली. अखंड हरिनाम सप्ताहाच्या प्रारंभी प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली) यांच्या उपस्थितीत वारकरी संप्रदायातील विविध मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. तसेच चाकण पंचक्रोशीतील सर्वपक्षीय कार्यकर्ते व पदाधिकारी यांचीही लक्षणीय उपस्थिती होती. या सत्कार समारंभात नगरसेवक विजया जाधव, साहेबराव कड, पुनम शेवकरी, विजया तोडकर, प्रकाश गोरे, साधना गोरे, जयश्री नाईकवाडी, रूपाली कांडगे, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, सागर बनकर, वर्षा शेवकरी, तृप्ती जगनाडे, आकाश जाधव, मंगेश कांडगे, अनिता घोगरे, धीरज मुटके, रेश्मा मुटके, आरती परदेशी, अनिल लोहकरे, प्रेम जगताप, रणजीत जरे, स्वीकृत नगरसेवक विकास धाडगे, महेश शेवकरी, शशिकांत जाधव तसेच पत्रकार अविनाश दुधवडे यांचा जाहीर सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य अमृत शेवकरी, ह. भ. प. मुक्ताजी महाराज नाणेकर, संत सावता माळी समाज मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, दोस्ताना ग्रुप चाकणचे अध्यक्ष हनुमंत मेदनकर, सचिव जयवंत रामाने, चाकण पतसंस्थेचे माजी व्हाईस चेअरमन निलेश टिळेकर, दोस्ताना ग्रुपचे संचालक मनीष गुगळे, राजेंद्र गोरे, सुरज परदेशी, सत्यवान गोरे, सुनील शहा, अतुल वाव्हळ, धोंडिभाऊ राक्षे, दादा लेंडघर, कीर्ती शहा, डॉ. रावसाहेब आवटे, शैलेश शहा, राजू कर्नावट यांच्यासह नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे सामाजिक धार्मिक परंपरा, लोकप्रतिनिधी व नागरिकांमधील सुसंवाद दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

# निरगुडसरच्या शेतकऱ्यांचा बटाटा उत्पादनात विक्रम

### शास्त्रीय पद्धतीने एका बियाण्याच्या पिशवीमागे वीस पिशव्या उत्पादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील शेतकरी गुलाब जयराम टाव्हरे व मंगेश जयराम टाव्हरे यांनी रब्बी हंगामात बटाटा पिकातून विक्रमी उत्पादन घेऊन परिसरातील शेतकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. योग्य नियोजन, आधुनिक शेती पद्धती आणि शास्त्रीय पीक व्यवस्थापनाच्या जोरावर त्यांनी ३० पिशव्या बियाण्यांपासून तब्बल ६०० पिशव्या बटाट्यांचे उत्पादन घेतले आहे. म्हणजेच एका बियाण्याच्या पिशवीमागे सुमारे वीस पिशव्या उत्पादन मिळाल्याने हा प्रयोग प्रेरणादायी ठरत आहे.

या यशामागे सेंद्रिय व रासायनिक खतांचा समतोल वापर, वेळेवर व शिफारशीनुसार फवारणी, तसेच काटेकोर पीक व्यवस्थापन कारणीभूत ठरले. किडी व रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी तज्ज्ञांच्या सल्ल्याने प्रतिबंधात्मक व गरजेनुसार उपचारात्मक फवारण्या करण्यात आल्या. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी कोंबड खताच्या सात ट्रॅक्टर ट्रॉली वापरण्यात आल्या. त्याचबरोबर माती परीक्षणानुसार रासायनिक खतांचा वापर, वेळेवर पाणी व्यवस्थापन, आंतरमशागत व तणनियंत्रण यावर विशेष भर देण्यात आला.

या संपूर्ण पिकासाठी एकरी सुमारे ६० हजार रुपये उत्पादन खर्च झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. मात्र एवढे मोठे उत्पादन मिळूनही बाजारात बटाट्याला सरासरी प्रति किलो ९ ते १० रुपये इतकाच दर मिळत असल्याने अपेक्षित आर्थिक लाभ होत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करीत आहेत. उत्पादन वाढ निश्चितच कौतुकास्पद असले, तरी योग्य बाजारभाव मिळाल्याशिवाय शेती परवडणारी ठरत नसल्याचे वास्तव या प्रयोगातून अधोरेखित झाले आहे.

---

# घोडेगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. संजय आर्विकर यांची बहुमताने निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** घोडेगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. संजय दत्तात्रय आर्विकर यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी ॲड. दीपक विलास लोहोटे व ॲड. माधुरी सदानंद ढवळे, सचिवपदी ॲड. अक्षदा मारुती ठोंबरे, तर खजिनदारपदी ॲड. संगिता गावडे यांची निवड झाली आहे. घोडेगाव वकील संघाची निवडणूक अत्यंत खेळीमेळीच्या व लोकशाही वातावरणात पार पडली.

निवडणुकीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष व सर्व पदाधिकाऱ्यांचा घोडेगाव वकील संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना अध्यक्ष ॲड. संजय आर्विकर यांनी न्यायालयातील वर्षभरातील शासकीय कार्यक्रमांचे नियोजन, न्यायालय परिसराचे सुशोभीकरण, स्वच्छ पाणीपुरवठा, तसेच वकील वर्गाच्या अडचणी व समस्या सोडवण्यासाठी संघ कटिबद्ध राहील, अशी ग्वाही दिली. वकील वर्गासाठी विविध उपक्रम, सुविधा व धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

ॲड. संजय आर्विकर हे गेल्या ३० वर्षांपासून वकिली व्यवसायात कार्यरत असून त्यांचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व सहकार क्षेत्राशी घनिष्ठ संपर्क आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ वकील संघाला नक्कीच मिळेल, असा विश्वास यावेळी अनेक मान्यवरांनी व्यक्त केला. या निवडणुकीसाठी

---

# धामणीतील श्री म्हाळसाकांत खंडोबा यात्रेच्या नियोजनाला प्रारंभ

### माघ पौर्णिमेला दोन दिवसीय यात्रा; फ्लेक्सबंदी कडक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**धामणी (ता. आंबेगाव) :** येथील उत्तर पुणे जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कुलदैवत श्री म्हाळसाकांत खंडोबा यांच्या माघ पौर्णिमा यात्रेच्या (दि. १ व २ फेब्रुवारी) नियोजनाची पहिली बैठक नुकतीच पंचांच्या परावर उत्साहात पार पडली. शासनाच्या सर्व आवश्यक परवानग्या घेऊन, नियमांचे काटेकोर पालन करत तसेच यात्रा कालावधीत फ्लेक्सबंदीची कडक अंमलबजावणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

यात्रा उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करत, सालाबादप्रमाणे पारंपरिक पद्धतीने तळी-भंडार उधळून यात्रेच्या तयारीची अधिकृत सुरुवात करण्यात आली. ही यात्रा आंबेगाव, शिरूर, जुन्नर, पारनेर व संगमनेर तालुक्यांतील लाखो भाविकांची श्रद्धास्थान असून दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. यात्रेदरम्यान दोन दिवस विविध धार्मिक विधी, देवाची पालखी (छबीना) मिरवणूक, भजन-कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्त्यांचा आखाडा आयोजित करण्यात येणार आहे. भाविकांसाठी सुरक्षितता, स्वच्छता, वाहतूक नियोजन आणि आरोग्य सुविधा याबाबत विशेष खबरदारी घेण्याचे ठरवण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही नवसाची बैलगाडा शर्यत, कुस्त्यांचा आखाडा, तमाशा, हारतुरे व कलगीतुरा हे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार असल्याचे सरपंच अक्षय विधाटे यांनी सांगितले.

---

### कांदा, बटाटा, गाजर, टोमॅटोची भरघोस आवक; पालेभाज्यांचे भाव घसरले, लसूण स्थिर

# चाकण बाजारात भाजीपाल्याची मोठी आवक; ६ कोटी ४० लाखांची उलाढाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये रविवारी (दि. १८ जानेवारी २०२६) कांदा, बटाटा, गाजर व टोमॅटोची मोठ्या प्रमाणात आवक झाली. भाजीपाल्याच्या वाढलेल्या आवकीमुळे काही भाज्यांचे भाव दबावात आले असून, पालेभाज्यांच्या दरात लक्षणीय घसरण झाली आहे. मात्र लसणाची आवक व बाजारभाव स्थिर राहिले.



फोटो : चाकण बाजारात कांद्याची झालेली मोठी आवक. (छाया : अविनाश दुधवडे, चाकण)

चाकण बाजारात कांद्याची सर्वाधिक ७ हजार क्विंटल आवक झाली. कांद्याच्या आवकीमुळे बाजारात चांगली चहलपहल दिसून आली. कांद्याचा कमाल भाव २,००० रुपयांवरून घसरत १,७०० रुपयांवर स्थिरावला, तर सरासरी भाव १,२०० ते ८०० रुपयांच्या दरम्यान राहिला. बटाट्याची एकूण आवक २,५०० क्विंटल झाली असून, मागील शनिवारच्या तुलनेत आवक ५०० क्विंटलने वाढली आहे. त्यामुळे बटाट्याच्या दरात सुमारे २०० रुपयांची घट झाली असून, कमाल भाव १,३०० रुपयांवर स्थिरावला आहे.

लसणाची आवक ५० क्विंटल इतकीच राहिली. मागील आठवड्याच्या तुलनेत आवक आणि दर स्थिर राहून लसणाचा कमाल भाव १२ हजार रुपयांवर कायम राहिला. हिरव्या मिरचीची ३०० क्विंटल आवक झाली असून, प्रती क्विंटल ६,००० ते ८,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

फळभाज्यांच्या बाजारात टोमॅटोची ३२८ क्विंटल आवक झाली असून, प्रती दहा किलोस १,५०० ते २,५०० रुपये भाव मिळाला. कोबी (२१५ क्विंटल) ७०० ते १,२०० रुपये, फ्लॉवर (२५० क्विंटल) ८०० ते १,४०० रुपये, वांगी (८४ क्विंटल) २,००० ते ३,००० रुपये, भेंडी (१०२ क्विंटल) २,५०० ते ३,५०० रुपये, दोडका (६८ क्विंटल) ३,५०० ते ४,५०० रुपये, कारली (६४ क्विंटल) ४,००० ते ५,५०० रुपये, गाजर (१७५ क्विंटल) १,००० ते २,००० रुपये, तर गवारला ७,००० ते ९,००० रुपये भाव मिळाला.

पालेभाज्यांच्या बाजारात मेथी, पालक व कोथिंबिरीची मोठी आवक झाल्याने दर घसरले. मेथीच्या ३३,६४१ जुड्या बाजारात दाखल झाल्या असून, भाव ३०० ते ५८० रुपये राहिला. कोथिंबिरीच्या ३९,३८७ जुड्यांना ४०० ते १,०१० रुपये, पालकाच्या ७,९०२ जुड्यांना २०० ते ४०० रुपये भाव मिळाला.

दरम्यान, जनावरांच्या बाजारातही चांगली उलाढाल झाली. जर्सी गायी, बैल, म्हशी तसेच शेळ्यामेंढ्यांच्या विक्रीत मोठ्या प्रमाणात व्यवहार झाले. शेळ्यामेंढ्यांना २,००० ते १५ हजार रुपयांपर्यंत दर मिळाला.

## सारांश वृत्त

### जमिनीच्या वादातून रांचीमध्ये गोळीबार

**रांची :** झारखंडमधील रांची येथे जमिनीच्या वादातून झालेल्या हिंसक संघर्षात दोन भावांसह तीन जणांना गोळी लागली, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. शनिवारी रात्री पिस्का मोरेजवळ ही घटना घडली, जेव्हा जमिनीच्या व्यवहारात ५५ लाख रुपयांच्या वाटणीवरून दोन गटांमध्ये हिंसाचार झाला, असे त्यांनी सांगितले. एका गटातील आकाश सिंग आणि विकास सिंग हे दोन भाऊ आणि दुसऱ्या गटातील आणखी एकाला गोळी लागली, असे पोलिसांनी सांगितले.

### दाट धुक्यामुळे उत्तर प्रदेशात अपघात

**बरेली (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशातील बरेली जिल्ह्यातील दिल्ली-लखनऊ राष्ट्रीय महामार्गावर रविवारी सकाळी दाट धुक्यामुळे किमान २० वाहने एकमेकांवर आदळल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला तर किमान २४ जण जखमी झाले, असे पोलिसांनी सांगितले. गोरखपूरहून मेरठला जाणाऱ्या राज्य महामार्गाच्या बसने एका ट्रकला धडक दिली, त्यानंतर दृश्यमानता कमी असल्याने मागून येणारी अनेक वाहने एकमेकांवर आदळली. यात तीन रोडवेज बसेस, एक ट्रक आणि अनेक कारचे नुकसान झाले. ट्रक महामार्गावरून उलटला आणि झाडांवर आदळला.

### धुक्यामुळे नूहमध्ये अनेक वाहनांची टक्कर

**गुरुग्राम :** दाट धुक्यामुळे रविवारी सकाळी नूह येथे कुंडली-मानेसर-पलवल (केएमपी) एक्सप्रेस वेवर अनेक वाहनांच्या धडकेत ट्रक चालकासह दोघांचा जळून मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. सकाळी ७:३० च्या सुमारास झालेल्या या अपघातामुळे एक्सप्रेस वेवरील वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आणि वाहतूक विस्कळीत झाली, असे त्यांनी सांगितले. सबरस आणि गुढी गावांदरम्यान अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी पाचारण करण्यात आल्या, असे सांगण्यात आले.

## एआयसाठी अमेरिकन पैसा भारतात का?

# भारतावर अमेरिकी नवारोंचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी पुन्हा एकदा भारताविरोधात तीव्र विधान करत वादाला तोंड फोडले आहे. इतर देशांमध्ये, विशेषतः भारतात, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रोत्साहनासाठी अमेरिकन निधीचा वापर का केला जातो, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा भारत-अमेरिका संबंधांमध्ये तणाव वाढताना दिसत आहे.

माजी व्हाइट हाऊस मुख्य रणनीतिकार स्टीव्ह बॅनन यांच्यासोबत 'रिअल अमेरिकाज व्हॉइसेस' या कार्यक्रमात बोलताना नवारो यांनी थेट भारताचे नाव घेत टीका केली. "चॅटजीपीटी अमेरिकन भूमीवर चालते, अमेरिकन वीज वापरते आणि त्याचा मोठा लाभ भारत, चीन आणि इतर देशांतील वापरकर्ते घेत आहेत. मग एआयसाठी अमेरिकन नागरिक भारतात पैसे का देत आहेत?" असा सवाल त्यांनी केला.

एआय डेटा सेंटर्स प्रचंड प्रमाणात वीज वापरतात आणि त्याचा थेट परिणाम अमेरिकेतील वीज खर्चावर होत असल्याचा आरोपही नवारो यांनी केला. "ही एआय सेंटर्स भारत आणि चीनसारख्या देशांमधील वापरकर्त्यांना सेवा देण्यासाठी चालवली जात आहेत, हे आश्चर्यकारक आहे," असे ते म्हणाले. नवारो यांच्या या वक्तव्यानंतर ट्रम्प प्रशासन कारवाई करू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. "एआय डेटा सेंटर्समुळे अमेरिकेत वाढणाऱ्या वीज खर्चावर आम्ही बारकाईने लक्ष ठेवत आहोत. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली यावर कडक पावले उचलली जाऊ शकतात," असे त्यांनी स्पष्ट केले. महत्त्वाचे म्हणजे, नवारो यांच्या टीकेच्या पार्श्वभूमीवरही अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्या भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. गुगलने पुढील पाच वर्षांत भारतात १५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे लक्ष्य जाहीर केले आहे. तसेच चॅटजीपीटीची मूळ कंपनी ओपनएआयदेखील भारतातील पायाभूत सुविधांमध्ये आपली गुंतवणूक वाढवत आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या देशांमध्ये या कंपन्यांचे वापरकर्ते मोठ्या संख्येने असल्याने भारत हा त्यांच्यासाठी महत्त्वाचा बाजार मानला जातो. भारताविरोधात कडक भूमिका घेण्यासाठी ओळखले जाणारे नवारो यापूर्वीही वादग्रस्त विधाने करत आले आहेत. त्यांनी भारत-अमेरिका व्यापार धोरणांवर सातत्याने टीका केली असून भारताला "टॅरिफचा राजा" असे संबोधले होते. तसेच भारताने रशियन तेल खरेदी केल्याचा संबंध युक्रेन युद्धाशी जोडत, भारत युद्धाला अप्रत्यक्षपणे निधी देत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

या आरोपांना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने तीव्र शब्दांत प्रत्युत्तर दिले होते. नवारो यांची विधाने चुकीच्या माहितीवर आधारित आणि पूर्णतः अस्वीकार्य असल्याचे सांगत भारताने ती फेटाळून लावली होती. आता एआय गुंतवणुकीच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा नवारो यांनी भारताला लक्ष्य केल्याने भारत-अमेरिका संबंधांतील तणाव अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# राजधानी दिल्लीत हवेची गुणवत्ता घसरली



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** रविवारी दिल्लीतील हवेची गुणवत्ता 'गंभीर' श्रेणीत घसरली कारण राष्ट्रीय राजधानीत दाट धुके पसरले होते, ज्यामुळे दृश्यमानता कमी झाली आणि प्रदूषण पातळी वाढली.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक ४४४ होता, जो गंभीर श्रेणीत मोडतो. ४०१ पेक्षा जास्त निर्देशांक हा धोकादायक मानला जातो. विशेषतः मुले, वृद्ध आणि श्वसनाचे आजार असलेल्यांसाठी तो गंभीर आरोग्य धोके निर्माण करतो.

प्रदूषकांच्या विघटनासाठी हवामान प्रतिकूल राहिले, सकाळी ८:३० वाजता १०० टक्के सापेक्ष आर्द्रता नोंदवली गेली.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे, ज्यामध्ये सकाळच्या वेळी दाट धुक्याबद्दल नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचा इशारा देण्यात आला आहे. कमी तापमान, शांत वारे आणि उच्च आर्द्रता पातळी यांच्या संयोजनामुळे प्रदूषकांचे संचय वाढले आहे, ज्यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे.

# राजदचे नेतृत्व तेजस्वी यादवांच्या हाती?

## २५ जानेवारी रोजी घोषणा होण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) नेतृत्व पूर्णपणे तेजस्वी यादव यांच्याकडे सोपवले जाईल असे संकेत आहेत. विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांना पक्षाचे कार्यवाहक राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नामांकित केले जाईल अशी चर्चा आहे. लालू प्रसाद यादव सध्या राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. २५ जानेवारी रोजी याची घोषणा केली जाईल असे वृत्त आहे. आगामी रणनीती आणि विधानसभा निवडणुकीतील पराभवाचा आढावा घेतला जात आहे. तेजस्वी यादव यांनी पाटणा येथील त्यांच्या अधिकृत निवासस्थानी कोअर कमिटी आणि लोकसभा आणि राज्यसभा सदस्यांसोबत बैठक घेतली.

लालू यादव यांच्यानंतर राजदमध्ये तेजस्वी आधीच दुसऱ्या क्रमांकाचे स्थान भूषवतात. धोरण ठरवण्याचे काम असो किंवा मोठे निर्णय, तेजस्वी यादव हेच ते सांभाळतात.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लालू प्रसाद यादव यांनी तेजस्वी यांना हे अधिकार सोपवले होते. तिकीट वाटपापासून ते विधानसभा निवडणुकीत तिकीट वाटपापर्यंत सर्व काही त्यांनी हाताळले. कार्यवाहक अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांची शक्ती आणखी वाढेल.

२५ जानेवारी रोजी पाटणा येथे पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या बैठकीत तेजस्वी यादव यांच्या नवीन जबाबदाऱ्या जाहीर केल्या जाऊ शकतात. राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांची तब्येत ठीक नाही आणि ते वारंवार आजारी असतात. हे पाहता, तेजस्वी यांच्याकडे पक्षाची सूत्रे सोपवण्याची चर्चा आहे.

# आठ देशांना अमेरिकी आयात शुल्काचा दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांच्या ग्रीनलँडला जोडण्याच्या योजनेला विरोध करणाऱ्या आठ देशांवर अमेरिकेने १० टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, युके, नेदरलँड्स आणि फिनलंडवर अतिरिक्त १० टक्के कर लादला जाईल. जर ग्रीनलँड खरेदी करार अंतिम झाला नाही तर हा कर २५ टक्क्यांपर्यंत वाढवला जाईल.



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जर या धोरणात्मक आर्क्टिक बेटावर अमेरिकेच्या नियंत्रणाला पाठिंबा दिला नाही तर कठोर कर लादण्याची धमकी दिली आहे. डेलावेअरमधील डेमोक्रॅटिक सिनेटर आणि शिष्टमंडळाचे नेते क्रिस कून यांनी सांगितले की, ग्रीनलँडबाबत सध्याच्या वक्तृत्वामुळे डेन्मार्कमध्ये चिंता निर्माण झाली आहे. ते म्हणाले की, त्यांना परिस्थिती शांत करायची आहे. मला आशा आहे की डॅनिश लोकांचा अमेरिकन लोकांवरचा विश्वास कमी होणार नाही, असे कोन्स यांनी कोपनहेगनमध्ये सांगितले. अमेरिकेला डेन्मार्क आणि नाटोबद्दल आम्ही एकत्र केलेल्या सर्व कामांबद्दल आदर आहे, असे ते म्हणाले.

त्यांच्या टिप्पण्या व्हाईट हाऊसमधून येणाऱ्या टिप्पण्यांपेक्षा अगदी वेगळ्या आहेत. ट्रम्प यांनी वारंवार ग्रीनलँडच्या अमेरिकेच्या विलीनीकरणाच्या आपल्या मागण्यांना समर्थन देण्याचा प्रयत्न केला आहे, असा दावा करून की चीन आणि रशियाचे ग्रीनलँडवर लक्ष आहे, जिथे मौल्यवान खनिजांचे प्रचंड साठे आहेत. व्हाईट हाऊसने हा प्रदेश जबरदस्तीने आपल्या विलीन करण्याची शक्यता नाकारलेली नाही. ग्रीनलँडला सध्या कोणताही सुरक्षेचा धोका नाही, असे कून म्हणाले. ट्रम्प अनेक महिन्यांपासून अमेरिकेने ग्रीनलँडवर नियंत्रण ठेवावे असा आग्रह धरत आहेत.

# उत्तरेत पावसासह हिमवृष्टीची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तीव्र थंडी दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याच्या मते, १९ आणि २१ जानेवारीच्या रात्री वायव्य भारतावर अनुक्रमे दोन पश्चिमी विक्षोभांचा परिणाम होण्याची शक्यता आहे. नैऋत्य राजस्थान आणि दक्षिण पाकिस्तानजवळील कमी पातळीवर चक्राकार वायू देखील कायम आहे.

या हवामान प्रणालींच्या प्रभावाखाली, १८ ते २२ जानेवारी दरम्यान जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि हिमाचल प्रदेशात विखुरलेला पाऊस पडण्याची शक्यता आहे. २३ जानेवारी रोजी मुसळधार पाऊस आणि जोरदार हिमवृष्टी अपेक्षित आहे. १८ जानेवारी रोजी उत्तराखंडमध्ये हलका, विखुरलेला पाऊस/हिमवृष्टी आणि २१ ते २३ जानेवारी दरम्यान मुसळधार पाऊस/हिमवृष्टी होण्याची अपेक्षा आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि पश्चिम उत्तर प्रदेशात २२ आणि २३ जानेवारी रोजी हलका ते मध्यम पाऊस पडेल. २३ जानेवारी रोजी पूर्व उत्तर प्रदेश आणि उत्तर राजस्थानमध्ये अशीच परिस्थिती राहील. पुढील दोन दिवसांत वायव्य आणि मध्य भारतात तापमानात अंदाजे २ अंश सेल्सिअसने वाढ होईल. पुढील दोन दिवसांत ३-५ अंश सेल्सिअसने आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील २४ तासांत पूर्व भारतात कोणताही बदल होणार नाही, त्यानंतर चार दिवसांत २-३ अंश सेल्सिअसने वाढ होईल आणि नंतर ते स्थिर राहील. देशातील उर्वरित भागात किमान तापमान अपरिवर्तित राहील. पंजाब, हरियाणा आणि चंदीगडमध्ये सकाळ आणि रात्रीच्या वेळी आणि उत्तर प्रदेशात १९ जानेवारीपर्यंत दाट ते खूप दाट धुके राहील. जम्मू, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, आसाम-मेघालय आणि इतर ठिकाणीही दाट धुके पडण्याची शक्यता आहे. १८ जानेवारी रोजी पूर्व उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी थंडीची लाट येईल.

## १६,५०० जणांचा मृत्यू, तीन लाखांवर जखमी

# इराणच्या निदर्शनांनी हादरवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डिसेंबर २०२५ च्या अखेरीस सुरू झालेल्या इराणमधील निदर्शनांनी आता संपूर्ण देशाला हादरवून टाकले आहे. महागाई आणि घसरत्या रियालसारख्या आर्थिक मुद्द्यांपासून त्यांची सुरुवात झाली, परंतु लवकरच ते सरकारविरोधी आंदोलनात रूपांतरित झाले, ज्यामध्ये सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. एका नवीन अहवालात असा दावा करण्यात आला आहे की सरकारच्या कारवाईत किमान १६,५०० निदर्शकांचा मृत्यू झाला आहे आणि ३,३०,००० हून अधिक जखमी झाले आहेत. बळी पडलेल्यांपैकी बहुतेक ३० वर्षांखालील तरुण आहेत. हा अहवाल जमिनीवर असलेल्या डॉक्टरांवर आधारित आहे.



अमेरिकेतील मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या वृत्तसंस्थेने ३,०९० मृत्यूंची पुष्टी केली आहे, ज्यात बहुतेक निदर्शकांचा समावेश आहे आणि २२,००० हून अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. सर्वोच्च नेते खामेनी यांनी पहिल्यांदाच जाहीरपणे कबूल केले की या अशांततेमुळे हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे गुन्हेगार असल्याचा आरोप केला आणि निदर्शकांना अमेरिकेचे पायदळ सैनिक म्हणून संबोधले. डॉक्टरांनी सांगितले की जखमींच्या डोक्यात, मानेवर आणि छातीवर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या, जे लष्करी दर्जाच्या शस्त्रांचा वापर दर्शवते.

जर्मन-इराणी नेत्र शल्यचिकित्सक प्रोफेसर अमीर परास्ता यांनी याला डिजिटल अंधाराच्या आडून नरसंहार म्हटले आहे. तेहरानच्या प्रमुख रुग्णालयांमधील आकडेवारीनुसार हजारो डोळ्यांना दुखापत झाल्याची नोंद आहे, ज्यामध्ये ७०० ते १,००० लोकांचे डोळे गेले आहेत. काही प्रकरणांमध्ये सुरक्षा दलांनी रक्त संक्रमणास परवानगी देण्यास नकार दिल्याने अनेक मृत्यू रक्तस्रावामुळे झाले आहेत. प्रोफेसर परास्ता म्हणाले की अधिकारी त्यांना थांबवल्याशिवाय मारत राहतील आणि तेच घडत आहे. ही कारवाई मुले आणि गर्भवती महिलांवरही लागू झाली आहे, ज्याला काही तज्ज्ञांनी नरसंहार म्हणून वर्णन केले आहे. इराणमध्ये गेल्या काही आठवड्यांपासून इंटरनेट ब्लॅकआउटचा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे माहितीचा प्रवाह पूर्णपणे थांबला आहे आणि देश जगापासून वेगळा झाला आहे.

# इंडोनेशियाच्या बेपत्ता विमानाचे अवशेष सापडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जकार्ता :** ढगाळ हवामानात सुलावेसी बेटावरील डोंगराळ प्रदेशाजवळ जाताना आदल्या दिवशी ११ जणांसह अपघातग्रस्त झालेल्या बेपत्ता विमानाचे अवशेष इंडोनेशियन बचाव पथकांना रविवारी सापडले.

टर्बोप्रॉप एटीआर ४२-५०० हे विमान इंडोनेशियाच्या जावा बेटावरील योग्याकार्ता येथून दक्षिण सुलावेसी प्रांताची राजधानी असलेल्या मकासारकडे जात होते, परंतु शनिवारी हवाई वाहतूक नियंत्रणाने त्याचा दृष्टिकोन दुरुस्त करण्याचे निर्देश दिल्यानंतर काही वेळातच ते रडारवरून गायब झाले.

इंडोनेशिया एअर ट्रान्सपोर्टद्वारे चालवले जाणारे हे विमान शेवटचे दुपारी १:१७ वाजता दक्षिण सुलावेसी प्रांतातील डोंगराळ जिल्ह्यातील मारोसच्या लियांग-लियांग भागात आढळले. त्यात आठ क्रू मेंबर्स आणि सागरी व्यवहार आणि मत्स्यव्यवसाय मंत्रालयाचे तीन प्रवासी होते जे हवाई सागरी देखरेख मोहिमेचा भाग म्हणून विमानात होते. रविवारी सकाळी हवाई दलाच्या हेलिकॉप्टरवरील बचाव पथकाला माउंट बुलुसाराउंगच्या उतारावरील जंगली भागात विमानाच्या एका लहान खिडकीसारखे काहीतरी दिसले, असे मकासरच्या शोध आणि बचाव कार्यालयाचे प्रमुख मुहम्मद आरिफ अन्वर यांनी सांगितले. त्यानंतर जमिनीवर असलेल्या बचाव पथकाने मुख्य फ्यूजलेज आणि शेपटीच्या बरोबरीने मोठा ढिगारा बाहेर काढला. आमचे संयुक्त शोध आणि बचाव पथके आता बळींचा शोध घेण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत, विशेषतः जे अजूनही जिवंत असू शकतात, असेही त्यांनी सांगितले.

जोरदार वारे, दाट धुके आणि खडकाळ भूभागामुळे शोधकार्य मंदावले.

रविवारी राष्ट्रीय शोध आणि बचाव संस्थेने प्रसिद्ध केलेल्या फोटो आणि व्हिडिओंमध्ये बचावकर्ते विखुरलेल्या अवशेषांपर्यंत पोहोचण्यासाठी दाट धुक्याने झाकलेल्या एका उंच, अरुंद पर्वतरांगातून प्रवास करत असल्याचे दिसून आले. इंडोनेशिया आपल्या १७,००० हून अधिक बेटांना जोडण्यासाठी हवाई वाहतूक आणि फेरीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. आग्नेय आशियाई देश अलिकडच्या काळात वाहतूक अपघातांनी त्रस्त आहे.

# ड्रग्ज सिंडिकेटचा दिल्लीत पर्दाफाश

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी नायजेरियन लोकांद्वारे चालवल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करी सिंडिकेटचा पर्दाफाश केला आहे, ज्यामध्ये दोन परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे आणि सुमारे ५ कोटी रुपयांचे कोकेन आणि एमडीएमए जप्त करण्यात आले आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या समन्वित कारवाईत ही अटक करण्यात आली. पोलिसांनी ४१८ ग्रॅम कोकेन आणि एमडीएमएच्या ९२५ गोळ्या जप्त केल्या.

# बॉम्बच्या धमकीमुळे आपत्कालीन लँडिंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** रविवारी सकाळी दिल्लीहून पश्चिम बंगालमधील बागडोगरा येथे जाणाऱ्या इंडिगो एअरलाइन्सच्या विमानाला बॉम्बच्या धमकीमुळे लखनऊ विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले, असे वृत्त दिले माध्यमांनी दिले आहे.

एअर ट्रॅफिक कंट्रोलला सकाळी ८.४६ वाजता धमकीची माहिती मिळाल्यानंतर इंडिगो फ्लाइट ६ई-६६५० हे विमान, ज्यामध्ये आठ बालकांसह २२२ प्रवासी, दोन वैमानिक आणि पाच क्रू मेंबर्स होते, सकाळी ९.१७ वाजता सुरक्षितपणे उतरले. सर्व प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



विमानाला ताबडतोब एका आयसोलेशन बेमध्ये हलवण्यात आले, जिथे बॉम्ब निकामी करणारे पथके, सुरक्षा संस्था आणि विमानतळ अधिकाऱ्यांनी व्यापक तपासणी केली. पोलिसांनी सांगितले की, प्राथमिक तपासणीदरम्यान, सुरक्षा कर्मचाऱ्यांना टिश्यू पेपरवर "प्लेन में बॉम्ब" (विमानात बॉम्ब) असे लिहिलेले एक हस्तलिखित चिठ्ठी सापडली. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## आसाममधून पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर हल्लाबोल

# 'देश विकास आणि सुशासनालाच पसंती देतो'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आसाममधील कालियाबोर येथे झालेल्या जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार टीका करत भाजपच्या निवडणूक यशाचा दाखला दिला. देशभरात भाजप ही जनतेची पहिली पसंती ठरत असून गेल्या दीड वर्षांत पक्षावरील विश्वास सातत्याने वाढत असल्याचा दावा त्यांनी केला.

बिहारमधील अलीकडील निवडणुकांचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की, वीस वर्षांनंतरही बिहारच्या जनतेने भाजपला विक्रमी मते दिली आणि मोठ्या संख्येने जागा जिंकून दिल्या.



त्याचप्रमाणे, महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये नुकत्याच झालेल्या महापौर आणि नगरसेवकांच्या निवडणुकांमध्येही भाजपला अभूतपूर्व यश मिळाले. जगातील सर्वात मोठ्या महानगरपालिकांपैकी एक असलेल्या मुंबईत पहिल्यांदाच भाजपला विक्रमी जनादेश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत विजय साजरा होत आहे, तर काझीरंगामध्ये जल्लोष सुरू आहे, असे ते म्हणाले.

या निवडणूक निकालांतून देशातील मतदारांचा संदेश स्पष्ट असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. आज जनतेला सुशासन आणि विकास हवा असून विकासाबरोबरच वारशालाही जपण्याची अपेक्षा आहे. त्यामुळेच मतदार भाजपच्या बाजूने ठामपणे उभे राहत असल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेसच्या राजकारणावर टीका करताना मोदी म्हणाले की, देश सातत्याने नकारात्मक राजकारणाला नाकारत आहे. ज्या मुंबई शहरात काँग्रेसचा जन्म झाला, त्या शहरात आज तो पक्ष चौथ्या-पाचव्या क्रमांकावर घसरला आहे, असा टोला त्यांनी लगावला.

ईशान्य भारताच्या विकासाबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, अनेक दशकांपर्यंत येथे विकास देशाच्या इतर भागांत होत असल्याची भावना होती, ज्याचा परिणाम केवळ अर्थव्यवस्थेवरच नव्हे तर लोकांच्या विश्वासावरही झाला. भाजप सरकारने ही मानसिकता बदलल्याचा दावा करत त्यांनी 'डबल इंजिन' सरकारमुळे ईशान्येला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणल्याचे सांगितले.

निसर्गसंवर्धनावर भर देताना पंतप्रधानांनी काझीरंगा अभयारण्याचे उदाहरण दिले. निसर्गाचे रक्षण केले, तर त्यातून संधी निर्माण होतात, असे सांगत त्यांनी गेल्या काही वर्षांत काझीरंगाला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत सातत्याने वाढ झाल्याचे नमूद केले. यामुळे स्थानिक तरुणांना होमस्टे, मार्गदर्शक सेवा, वाहतूक, हस्तकला आणि लघुउद्योगांतून नव्या उत्पन्नाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

एकशिंगी गेंड्यांच्या संरक्षणाचा उल्लेख करताना मोदी म्हणाले की, काही वर्षांपूर्वी काझीरंगामधील गेंड्यांची शिकार ही मोठी समस्या होती. २०१३-१४ मध्ये डझनभर गेंडे मारले गेले होते. भाजप सरकारने ही स्थिती बदलण्याचा ठाम निर्णय घेतला. सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली, वन विभागाला आधुनिक साधने देण्यात आली, देखरेख वाढवली आणि महिलांचा सहभागही वाढवण्यात आला. या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसून आले असून २०२५ पर्यंत गेंड्यांच्या शिकारीची एकही घटना नोंदवली गेली नसल्याचा दावा पंतप्रधानांनी केला.